# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 17/03/2021 (बुधवार)
(सकाळ)

---

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत बिना संगम येथे दिनांक 14/03/2021 चे 12.30 वा. ते 13.00 वा. दरम्यान बिना संगम रेती घाटातुन कन्हान नदीच्या पात्रातील रेती बिना संगम गावातील मुस्लीम समशान घाटाजवळ स्टॉक करून ठेवलेली होती. ट्रक चालक आरोपी क्र. 1) दिनेश चितांमण दुधुके, वय 37 वर्ष, रा. वारेगाव वार्ड क्र 2 याने त्याचे ताब्यातील एमएच– 40/बीएल– 6772 क्रमांकाच्या ट्रक मध्ये आरोपी क्र 2) वामन भडंग(ट्रक मालक), रा. बिना याचे सांगण्यावरून ट्रकमध्ये रेती भरून विनापरवाना अवैध्यरीत्या वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुन 05 ब्रास रेती किं 20,000/–रू. सह ट्रक किमंत 1,00,000/–रू. असा एकुण 1,20,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक दीपक रेवतकर यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 379, 109 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपी अटक नाही कारण सदर गाडी मध्ये असलेल्या रेतीची रॉयलेटी पोस्टेला हजर केल्याने याबाबत तपास सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि शेवाळे 9421320411 हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 06 कि.मी. अंतरावरील कोदेगाव शिवार येथे दिनांक 16/03/2021 चे 00:30 वा. दरम्यान एम.एच–40/बी.एल–9969 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपी नामे– सिताराम श्रीराम नेवारे, वय 42 वर्ष, रा. मनसर, ता. रामटेक याने आपले ट्रक कोदेगाव शिवारातील एन.एच– 249 वर उभे करून ट्रकला कोणतेही इंडीकेटर किंवा पार्किंग लाईट न लावता अपघात होईल अशा स्थितीत उभे केले होते. त्यादरम्यान एम. एच–31/डी.एक्स–1301 क्रमांकाच्या पल्सरचा चालक नामे– राहुल भिमराव शेंडे, वय 21 वर्ष हा आपले इतर दोन साथीदार आयुष संजय चंकापुरे, वय 18 वर्ष व आदित्या अंबादास गजभिये, वय 18 वर्ष यांना मोटरसायकलवर सोबत घेवुन ट्रिपल सिट खापा ते सावनेर कडे जात असतांना उभ्या टिप्परला मागुन धडक दिली. या अपघातात तिघेही गंभीर जखमी होवुन घटनास्थळी जागीच मरण पावले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आकाश मोहन बांबोडे वय 22 वर्ष, रा. आग्रा, ता.नरखेड यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 283, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री झांबरे 9028748409 हे करीत आहे.

2) पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील येथे दि. 16/03/2021 चे 18.12 वा. दरम्यान विजय शरणागत हा आपले शेतातुन रस्त्याने डांबरी रोडने पायदळ जात असता कोणत्या तरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन त्यास धडक दिली. या अपघातात तो जागेवरचा मरण पावला. तसेच अज्ञात वाहन चालक आपले वाहन मोक्यावरून गेला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– किशोर प्रभाकर शरणागत, वय 32 वर्षे रा डोंगरी ता. रामटेक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 304 (अ), 279 भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री राउत 9881783184 हे करीत आहे.

3) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 30 कि.मी. अंतरावरील मौजा हळदगाव ते परसोडी जाणारा रोड येथे दिनांक 20/01/2021 चे 18:00 वा. दरम्यान सखु रामाजी सवाईमुल (मृतक) वय 70 वर्ष, रा. गोबोरी, ता.भिवापुर ही शेतातुन कापुस वेचण्याचे काम करून आपल्या शेतातुन घरी परत येत असतांना हळदगाव ते परसोडी जाणा–या रोडवर पडुन होती. तिचे हाताला व पायाला घसाटयाच्या मार लागल्याचे दिसत होते. जखमीला प्रथम उपचारा करीता मेडीकल कॉ. नागपुर येथे भरती केले असता ती उपचारा दरम्यान मरण पावली. पोलीस स्टेशन, कुही येथे प्राप्त कागदपत्रावरून मर्ग क्रं.04/2021 कलम 174 जाफौ.प्रमाणे दाखल करण्यात आला होता. सदर मर्गचा चौकशीत दि. 20/01/2021 रोजी 06/00 वा. दरम्यान शेतातुन घरी परत येत असतांना हळदगाव ते परसोडी जाणा–या रोडवर कोणत्यातरी अज्ञात वाहनाचा चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपणे व बेदरकारपणे चालवुन तिला धडक देवुन गंभीर जखमी केले. उपचारा दरम्यान मेडीकल कॉ.नागपुर येथे ती मरण पावल्याने मर्ग चौकशीत निष्पन्न झाल्याने सदरचा गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी सरतर्फे मसपोनि सुचिता मंडवाले, यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सुचिता मंडवाले या करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. नरखेड :– अंतर्गत येणीकोणी शिवार येथे दिनांक 15/03/2021 चे 16.00 वा. ते 18.00 वा. दरम्यान अर्जदार फिर्यादी नामे– वासुदेव गोपाळराव भुसारी वय 53 वर्ष रा. येणीकोणी तह नरखेड व त्यांचा पुतण्या नामे– रामकृष्णाजी कुसारी, वय 35 वर्ष, रा. येणीकोणी असे दोघांचे शेत येणीकोणी शिवारात वेगवेगळे आहेत. त्यांचे दोन्ही शेताच्या मधातुन रोड गेलेला आहे. फिर्यादींचा पुतण्या मुकेश रामकृष्णाजी भुसारी(मृतक), वय 35 वर्ष, रा. येणीकोणी हा दि 15/03/2021 रोजी दुपारी 01.00 वा. फिर्यादीचा जेवणाचा डब्बा घेवुन शेतात आला व डब्बा देउन तो आपल्या शेतात पाणी ओलविण्यासाठी जातो असे म्हणुन निघुन गेला होता. त्यानंतर दुपारी 04.00 वा. मोठा पुतण्या दिनेश हा त्याचे शेतात गेला असता त्याला मुकेश हा दिसला नाही त्यामुळे त्याने आपला लहान भाउ मुकेश याला जोरा जोराने आवाज देवु लागला लगेच फिर्यादीचे शेतात दिनेश आला व म्हणाला की, ''मुकेश हा दिसत नाही'' तेव्हा मोठा पुतण्या दिनेश आणि लहाण पुतण्या राजेश असे तिघे मिळुन शेतातील मोसंबीच्या बगीच्यात त्यांनी पाहणी केली असता मुकेश दिसुन न आल्याने त्याला फोन लावला असता फोन बंद येत होता. दिवसभर त्याचा इतर ठिकाणी शोध घेतला असता तो मिळुन न आल्याने दि. 16/03/2021 रोजी पो स्टे. नरखेड ला हरवल्याची तक्रार दिली होती. दि 16/03/2021 रोजी सकाळी 08.00 दरम्यान मुकेश याचा शोध घेणे कामी फिर्यादी हे खैरी नवघरे या गावी गेले होते. तेथुन ते परत येत असतांना त्यांना दुपारी 02.00 वा. दरम्यान फिर्यादीच्या मुलीने फोन करून सांगितले की, ''मुकेश दादा हा त्यांचे शेतातील विहीरीचे पाण्यात बुडुण मरण पावला आहे.''

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा प्रकाश खोपे पो.स्टे. नरखेड हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 19 कि.मी. अंतरावरील गोंडी खापा शिवार दिनांक 15/03/2021 चे पुर्वीपासुन फिर्यादींचा मुलगा नामे– मनोज मधुकर यूवनाते, वय 19 वर्ष, रा. गोंडी खापा हा बाहेर गावी कामाला जात होता व 1 ते 2 महीने परत येत नव्हता. गावातील लोक काडया तोडण्याकरीता जंगलात गेले असता त्यांना मनोज यूवनाते हा जंगलामध्ये गळफास घेवून कुजलेल्या अवस्थेत दिसून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– मधूकर हीरामन युवनाते, वय 45 वर्ष, रा. गोंडी खापा यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री संतोष निभोरकर 9527347443 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर